# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/06/2023 (सोमवार) सकाळ


### जबरी संभोग करून जिवे ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :– फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. २०१/२०२० कलम ३७६(१) (एन), ३०७, ३५४(ड) भादवि सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष ही घराजवळील विहीरीजवळ हात धुवत असतांना यातील **आरोपी नामे– बळदेवसिंग लखनसिंग पंधराम, वय २७ वर्ष रा. मोहखेड (मध्य प्रदेश)** याने तेथे येवुन फिर्यादी सोबत जबरी संभोग करुन विहीरीत फेकुन देवुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक रासकर मॅडम यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. त्रिवेदी सा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक १९/०६/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. त्रिवेदी सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०७ भादवि. मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/– रु. दंड. दंड न भरल्यास ०१ महीने सश्रम कारावास तसेच कलम ३५४ भादवि. मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,०००/– रु. दंड. दंड न भरल्यास ७ दिवस सश्रम कारावास तसेच कलम ३५४ (ड) भादवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,०००/– रु. दंड. दंड न भरल्यास ७ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी सोनाली राउत मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/८९ प्रमोद कडबे पो.स्टे कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

आज दिनांक १८/०६/२०२३ रोजी महादुला शिवार, गब्बाढाबा समोरील नॅशनल नागपूर ते भंडारा कडे जाणारा हायवे –५३ ला लागुन असलेल्या संदिप लांडे यांच्या शेतामध्ये एक मृत अवस्थेत पुरूष जातीचे प्रेत मिळुन आल्याचे माहिती वरून पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस निरीक्षक हेमंतकुमार खराबे, सहायक पोलीस निरीक्षक सतिश सोनेकर, निशा भुते, पोलीस हवालदार चांदेवार, मेश्राम, पुजारी, पोलीस नायक बरोदीया, दरोडे, महादुले, डोईफोडे, कुडुपले, पोलीस शिपाई हटवार हे तात्काळ घटनास्थळावर पोहचले घटनास्थळावर संदिप लांडे यांच्या शेतामध्ये असलेल्या प्रेताची हजर असलेल्या लोकांकडुन ओळख पटविले असता सदरचे प्रेत हे अश्विन रतन शेंडे, वय २५ वर्ष, रा. धानला ता. मौदा जिल्हा नागपूर यांचे असल्याचे समजले. तसेच मृतकाचे वडील नामे रतन जनार्धन शेंडे, वय ५० वर्ष याने मृतकास बांबुच्या काठीने मारझोड करून मृतकाचा नायलॉन दोरीने गळा आवळुन त्याचा खुन केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपी ताब्यात घेतले. तसेच दोन शासकीय पंचासमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. व मोक्यावरून पुराव्याकामी काठीसह इतर मुद्देमाल जप्त करण्यात आले. यातील आरोपीस सदर गुन्हयासंदर्भात सखोल विचारपुस केली असता त्याने सांगितले की, यातील मृतक हा आरोपीची गाडी ३ ते ४ दिवसापासुन घेऊन गेला होता. व त्यास दोन तिन वेळा मारहाण केले होते व तो रोज दारू पित होता. काल रात्री

०९.३० वा. सुद्धा आरोपीस मृतकाने मारहाण केली असल्याने मृतकाच्या मनात राग धरून त्यास जिवानीशी ठार मारण्याचे मनात ठेवून आरोपीने मृतकाचा खुन केला असल्याचे निष्पन्न झाले वरून पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०२ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी मा. विशाल आनंद, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, मा. डॉ. संदिप पखाले, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, मा. आशित कांबळे, सहायक पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक अति. कार्यभार कामठी विभाग यांनी भेट दिले असुन सदर गुन्हयाचा तपास मा. आशित कांबळे, सहायक पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक अति. कार्यभार कामठी विभाग हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**